# महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग
# Maharashtra Electricity Regulatory Commission

माहितीचा अधिकार

MERC/ADM/RTI/032/2021/**0294** Dt. 07.07.2021

प्रति,
श्री. जगनसिंह राजपूत (जेष्ठ नागरीक),
ओमसाई निवास, बॅरेक नंबर ८,
रूम नं. ४, उल्हासनगर-१,
जि. ठाणे - ४२१००१

विषय :- आपला माहितीचा अधिकार अधिनियम, 2005 अंतर्गत अर्ज.

महोदय,

आपला दि. २८.०५.२०२१ रोजीचा माहिती अधिकार अधिनियम, २००५ चे कलम ६ (१) प्रमाणे केलेला अर्ज आयोगाच्या कार्यालयास दि.०८.०६.२०२१ रोजी प्राप्त झालेला आहे. आपणांस आवश्यक असलेला माहितीचा तपशील खालीलप्रमाणे नमूद केलेला आहे.

| No | Information Sought | Information Provided |
|---|---|---|
| १ | आपल्या विज वितरन कंपनी कल्याण झोनच्या ग्राहक तक्रार न्यायमंचाने बहुसंख्य सुनावणी घेण्यात आली पण त्याचे आदेश नियमबाध्य देण्यात आले नाही म्हणून जबाबदारी कोणाची राहील याची स्वाक्षरी प्रत मिळावी. | आपण विचारलेली माहिती ही प्रश्नार्थक स्वरूपाची आहे तसेच सदर कायदा हा काल्पानिक प्रश्न उपस्थित करण्याची किंवा जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्रश्नांची उत्तरे शोधून देणे अपेक्षित नाही. माहिती अधिकार अधिनियम, २००५ २(च) नुसार माहिती मागावी जेणेकरून आपणास जन माहिती अधिकारी यांच्याकडून आपणांस माहिती उपलब्ध करून देणे सोयीचे होईल.<br><br>माहितीचा अधिकार अधिनियम 2005 अन्वये प्रकरण 1 मधील 2 (च) नुसार "माहिती" (Information) याचा अर्थ, कोणत्याही स्वरूपातील कोणतेही साहित्य असा असून त्यामध्ये, अभिलेख, दस्तऐवज, ज्ञापने (Memoes), ई-मेल, अभिप्राय, सूचना, प्रसिध्दीपत्रके, परिपत्रके, आदेश, रोजवहया, संविदा, अहवाल, कागदपत्रे, |
| २ | आपल्या कल्याण मंडळ-२ अंतर्गत ग्राहक तक्रार न्यायमंचामध्ये सुनावणी दरम्यान लायसेन्सीचा कोणताही अधिकारी नसल्यास सुनावणी घेवून चुकीच्या कागदपत्रावर आदेश देण्यात येतात म्हणून सदर बाबत जबाबदारी अंतर्गत न्यायमंचाची राहील कि लायसेन्सची त्याची स्वाक्षरी प्रत मिळावी. | |
| ३ | आपल्या कल्याण मंडळ-२ मध्ये अंतर्गत न्यायमंचाच्या आदेशाची अंमलबजावणी नियमबाध्य होत नाही व अवमानना लायसेन्सी करत आहे. म्हणून अशा लायसेन्सी अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची जबाबदारी कोणत्या अधिकाऱ्याची आहे त्याची स्वाक्षरी प्रत मिळावी. | |

१३वा मजला, केंद्र क्र. १, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, मुंबई - ४०० ००५.
13th Floor, Centre No. 1, World Trade Centre, Cuffe Parade, Mumbai - 400 005.
**Tel.:** 022-2216 3964 / 2216 3965 / 2216 3969 **Fax :** 022-2216 3976
**E-mail :** mercindia@merc.gov.in **Website :** www.merc.gov.in

| | | |
|---|---|---|
| ४ | आपल्या कल्याण झोनच्या ग्राहक तक्रार न्यायमंचाच्या आदेशाची अंमलबजावणी नियमबाध्य होत नाही आदेशाची अवमानना करण्यात येते म्हणून ग्राहक तक्रार न्यायमंचाला दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याचा अधिकार असल्याचा जिआर स्वाक्षरी प्रत मिळावी. | नमुने, प्रतिमाने, (मॉडेल), कोणत्याही इलेक्ट्रॉनिक स्वरूपातील आधारसामग्री आणि त्या त्या वेळी अमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्यान्वये सार्वजनिक प्राधिकरणांस मिळविता येईल अशी कोणत्याही खाजगी निकायाशी संबंधित माहिती, यांचा समावेश होतो. |

माहितीचा अधिकार कायदा, २००५ नुसार आपणास ३० दिवसात माहिती उपलब्ध करून देणे आवश्यक होती परंतू, संपूर्ण राज्यात कोवीड-१९ संसर्ग महामारीच्या प्रादुर्भावामुळे आपणास वेळेत माहिती पाठविण्यास विलंब झाला याची नोंद घ्यावी.

माहिती अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९(१) अन्वये श्री अनिलकुमार उके, संचालक (विधी) प्रभारी /प्रथम अपीलीय अधिकारी आहेत. पत्ता:- महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, जागतिक व्यापार केंद्र, सेंटर १, १३ वा मजला, कफ परेड, मुंबई-४००००५. दूरध्वनी क्र.०२२-२२१६३९६४/६५ /६९. **Email: anilkumar.ukey@merc.gov.in**

आपला विश्वासू,

प्रदिप मोहरे

(प्रदिप मोहरे)
जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी